आदेश

प्रा.आ.केंद्र खिरविरे,ता.अकोले येथील प्रथम वैद्यकीय अधिकारी या पदाचे आहरण व संवितरणासह प्रशासकीय कामकाजाचे अधिकार प्रदान करणेबाबत.

जिल्हा परिषद, अहमदनगर
आरोग्य विभाग आस्थापना-२
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-२/७६२/२०२१,
दिनांकः- २५ मे,२०२१

वाचाः-

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१
२. महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम-१९८१ चे नियम-५६ अन्वये.
३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अनगर यांचेकडील आदेश जा.क्र. साप्रवि-१/ रवका/६९६/१६, दि.१७.०६.२०१६
४. कडील आदेश जा.क्र.आरोग्य/कार्या२/आस्था२/१६३५/२०१८,दि.१५.०६.२०१८
५. वै.अ.प्रा.आ.केंद्र खिरविरे,ता.अकोले यांचेकडील पत्र क्र.आरोग्य/आस्था/४७/२०२१, दि.०१.०५.२०२१
६. कार्यालयीन मंजुर टिप्पणी दिनांकः- २४.०५.२०२१

संदर्भ क्र.४ अन्वये डॉ.यशवंत लक्ष्मण खोकले वैद्यकीय अधिकारी गट-अ प्रा.आ.केंद्र खिरविरे,ता.अकोले, जिल्हा अहमदनगर यांचेकडेस प्रथम वैद्यकीय अधिकारी या पदाचा नियमित कार्यभार सोपविण्यात आलेला होता. डॉ.खोकले हे कोविड-१९ आजारामुळे दिनांक ०१.०५.२०२१ रोजी वैद्यकीय कारणास्तव मयत झालेले असल्याचे संदर्भ क्र.५ अन्वये कळविण्यात आलेले आहे. प्रशासकीय सोय विचारात घेवून प्रथम वैद्यकीय अधिकारी गट-अ प्रा.आ.केंद्र खिरविरे,ता.अकोले या पदाचा नियमित कार्यभार डॉ.रमाकांत भगवान पाटील व्दितीय वै.अ.गट-ब वर्ग-२ प्रा.आ.केंद्र खिरविरे,ता.अकोले यांचेकडेस सोपविणे आवश्यक आहे.

संदर्भ क्र.१ व २ मधील तरतुदीनुसार व संदर्भ क्रमांक-३ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून, मी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर आदेश देतो की, प्राथमिक आरोंग्य केंद्र खिरविरे, ता.अकोले,जिल्हा अहमदनगर येथील प्रशासकीय सोय विचारात घेवून प्रथम वैद्यकीय अधिकारी या पदाचा आहरण व संवितरणासह प्रशासकीय कामकाजाचा नियमित कार्यभार डॉ.रमाकांत भगवान पाटील वै.अ.गट-ब वर्ग-२ यांचेकडेस सोपविण्यात येत आहे. डॉ.रमाकांत पाटील यांनी प्रा.आ.केंद्र खिरविरे,ता.अकोले येथील कार्यभार एकतर्फी ताब्यात घ्यावा. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच कार्यभार हस्तांतरण अहवाल तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती अकोले यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा. यामध्ये हयगय अगर टाळाटाळ केल्यास नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या **www.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्रमांक – 202105251000050 असा आहे.

(डॉ.संदिप सांगळे)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर.

प्रति,

१. डॉ.रमाकांत भगवान पाटील प्रथम वै.अ.गट-ब वर्ग-२ प्रा.आ.केंद्र खिरविरे,ता.अकोले,जिल्हा अहमदनगर
२. व्दारा व प्रतः- तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती अकोले,ता.अकोले,जिल्हा अहमदनगर

प्रतः- माहितीसाठी सादर.

१. मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ संदर्भ सेवा रूग्णालय आवार,शालीमार चौक नाशिक

प्रतः- कार्यवाहीस्तव.

१. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,अहमदनगर.
२. गट विकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती अकोले,ता.अकोले,जिल्हा अहमदनगर
३. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य खिरविरे,ता.अकोले,जिल्हा अहमदनगर
४. वेतन देयक शाखा-२ आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर.
५. निवड नस्ती आस्थापना-२ शाखा.